(2)

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र./२०१९-२०

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१९-२० मधील ४ जुलै, २०१९ च्या बैठकीचे इतिवृत्त.**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०१९-२० ची चौथी सभा गुरूवार दिनांक ४ जुलै, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता सर फिरोजशहा मेहता, व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | डॉ. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४. | प्रा. (डॉ.) अजय भामरे (प्रभारी, प्र-कुलगुरू) | सदस्य |
| ५. | श्रीमती (डॉ.) रश्मी ओझा | सदस्य |
| ६. | प्रा. (डॉ.) अजय भामरे | सदस्य |
| ७. | डॉ. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ८. | प्रा. डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ९. | डॉ रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| १०. | श्री. सुभाष वाघमारे | सदस्य |
| ११. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १२. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १३. | प्रा. बि.एन. जगताप | सदस्य |
| १४. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १५. | डॉ. अजय देशमुख (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १६. | डॉ. विनोद पाटील (संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १७. | श्री. संजय शाह (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **अनुपस्थिती :-**

प्राचार्य डॉ. कुऱ्हाडे यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांना अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.



SKJ

श्रध्दांजली

**श्री. म.सु.पाटील**

मराठी साहित्यातील व्यासंगी काव्य समीक्षक श्री. म.सु. पाटील यांचे वृध्दपकाळाने दिनांक ०१ जुन, २०१९ रोजी निधन झाले.

**डॉ. चंद्रकात पुरी**

एसएनडीटी दूरस्थ शिक्षण विभागाचे संचालक डॉ. चंद्रकात पुरी यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०७ जुन, २०१९ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५० वर्षाचे होते.

**श्री. गिरीश कर्नाड**

राष्ट्रीय पातळीवरचे थोर नाटककार श्री. गिरीश कर्नाड यांचे वृध्दपकाळाने दिनांक १० जुन, २०१९ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षाचे होते.

➢ **स्वागत**

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा. अध्यक्षांना सभेचे कामकाज सुरू करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली. मा. अध्यक्षांनी देखील उपस्थित सर्वांचे स्वागत करून सभेची कार्यवाही सुरू करण्यास अनुमती प्रदान केली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| **बाब क्र. १** | **दिनांक १ जून, २०१९ झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.** | **कार्यकारी प्रा. विभाग** |
| **ठराव** | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येईल. | |
| **बाब क्र. २** | **दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ व ७ डिसेंबर, २०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरील कार्यवाही अहवाल.** | **कार्यकारी प्रा. विभाग** |
| **ठराव** | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येईल. | |
| **बाब क्र. ३** | **फादर सी. रॉड्रिग्स इन्स्टीटयुट ऑफ टेक्नोलॉजी, वाशी, नवी मुंबई, यांच्याकडून** Ph.D. (Science & Technology) degree in Electrical Engineering, **या अभ्यासक्रमाचे** Continuation of Recognition **चे विलंब शुल्क माफ करण्याबाबतचा प्रस्ताव.** | **प्रबंध विभाग** स्नातकाला |

| | | |
|---|---|---|
| ठराव | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत इतिवृत्ताच्या चर्चेच्या अनुषंगाने मुद्दा क्रमांक २ च्या अन्वये पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या उच्चस्तरिय समिती समोर ठेवण्यात यावी.<br>तसेच अशा प्रकारची सर्व प्रकरणे सलग्नता व मान्यता विभाग व प्रबंध विभाग यांनी प्रथम उच्चस्तरिय समिती समोर ठेऊन सदर समितीचा अहवाल एकत्रित स्वरुपात व्यवस्थापन परिषदे समोर ठेवण्यात यावा. उच्चस्तरीय समितीमध्ये संलग्नित महाविद्यालयांच्या संस्थांचा व प्राचार्यांचा एक प्रतिनिधीचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रस्तावास परिषेदेचे सदस्य डॉ. अजय भामरे यांनी मांडला त्यास परिषदेच्या सदस्या डॉ. रश्मी ओझा यांनी अनुमोदन दिले. संबधीत सदस्य नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले. | |
| बाब क्र. ४ | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी (कलिना) परिसरातील सांस्कृतिक संकुलाला हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे आर्टस् ॲंड कल्चरल सेंटर असे नामकरण करणेबाबत व सदर संकुलात मा. श्री. बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र सुरू करण्याबाबत. | सामान्य प्रशासन विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरातील सांस्कृतीक संकुलाला हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे आर्टस ॲण्ड कल्चरल सेंटर असे नामकरण करण्याबाबत व सदर संकुलात श्री. बाळासाहेब ठाकरे अध्यसन केंद्र सुरु करण्याबाबतचा निर्णय घेण्यापुर्वी प्रथम याबाबत नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनामध्ये झालेली चर्चा व निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून तातडीने मागवून पुढील सभेमध्ये निर्णय घेण्यात यावा. | |
| बाब क्र. ५ | अनुकंपा तत्त्वावरील श्री सिध्देश चव्हाण, श्री. विपुल खंदारे, श्री. सुनिल मिसाळ व श्री. प्रविण मुळम यांची गट 'क' प्रवर्गातील कनिष्ठ टंकलिपिक पदावरील सेवा समाप्त करून गट 'ड' | आस्थापना विभाग १ व ३ |

| | | |
|---|---|---|
| | **प्रवर्गातील 'शिपाई' या पदावर केलेली नियुक्ती पुन:श्च गट–'क' प्रवर्गात करणेबाबत सादर केलेला अर्ज.** | |
| **ठराव** | अनुकंपा तत्वावरील श्री. सिध्देश चव्हाण, श्री. विपुल खंदारे, श्री. सुनिल मिसाळ व श्री. प्रविण मुळम यांनी 'क' प्रवर्गातील कनिष्ठ टंकलिपीक पदावरील सेवा समाप्त करुन गट 'ड' प्रवर्गातील नियुक्ती पुन:श्च गट –क प्रवर्गात करणेबाबत करण्यात आलेली विनंती शासन निर्णय क्र.अकंपा१२१७/प्र.क्र.१०२/८ दिनांक २१/९/२०१७ नुसार मान्य करता येणार नाही. सभेमध्ये कु. कश्मिरा म्हात्रे हिच्या ब-याच कालावधीपासुन प्रलंबित असलेल्या अनुकंपातत्वावरील नियुक्तीच्या प्रकरणाबाबत चर्चा करण्यात आली.<br>चर्चेच्या अनुषंगाने असेही ठरले की, अनुकंपातत्वाबाबत सर्व प्रलंबित प्रकरणे सक्षम प्राधिकरणासमोर तातडीने सादर करण्यात यावीत. | |
| बाब क्र. ६ | **हंगामी कर्मचा–यांबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत बाब कमांक ७ अन्वये पारित झालेल्या ठरावानुसार मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयावर प्राप्त विधिज्ञांचा सल्ला विचारार्थ सादर.** | आस्थापना विभाग १ व ३ |
| **ठराव** | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १ जून, २०१९ रोजीच्या सभेमध्ये या विषयांवर झालेल्या निर्णयानुसार विधीज्ञ श्री. शेखर नाफाडे यांच्याकडून प्राप्त सल्ल्यावर विस्तृत चर्चा झाली. मा. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयामध्ये हंगामी कर्मचा–यांबाबत विद्यापीठाच्या धोरणावर अनेक ताशेरे ओढले. हंगामी कर्मचा–याची वेळोवेळी झालेली नियुक्ती, तेव्हा अस्तित्वात असलेल्या परिस्थितीचा विचार व तत्कालीन आवश्यकतेनुसार कर्मचा–यांची केवळ हंगामी | |

| | | |
|---|---|---|
| | तत्वावर नियुक्ती करण्यात आली होती. नियुक्ती संदर्भात प्रचलित व कायदेशीर प्रक्रिया देखील पूर्ण करण्यात आलेली नाही. म्हणून विद्यापीठाची भुमिका आणखी सुस्पष्टपणे मांडण्यासाठी मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देण्याचा ठराव सभेमध्ये पारित करण्यात आला. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये विद्यापीठाची बाजू मांडण्यासाठी विधीज्ञ नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले. या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश देखिल व्यवस्थापन परिषदेने दिले. परिषदेच्या या निर्णयास मा. सदस्य डॉ. श्री. रविकांत सांगुडे यांनी आक्षेप नोंदविला.<br>या विषयाचे कार्यवृत्त या सभेमध्यचे कायम करण्यात आले.<br>आयत्यावेळी आलेल्या बाबी | |
| बाब क्र. ७ | **१. Institute of Democracy and Election for Good Governance (IDEGG) या राज्य निवडणूक आयोगाच्या संस्थेचे मुंबई विद्यापीठ संस्थापक सदस्य होण्यासाठीची परवानगी**<br>**२. Institute of Democracy and Election for Good Governance (IDEGG) या संस्थेचे संस्थापक सदस्यत्वासाठीचे शुल्क म्हणून रु. ५,००,०००/- (रु. पाच लक्ष मात्र) मुंबई विद्यापीठाच्या सामान्य निधीमधून उपलब्ध करुन देण्याची परवानगी.** | |
| ठराव | Institute of Democracy and Election for Good Governance (IDEGG) या राज्य निवडणुक आयोगाच्या संस्थेचे 'मुंबई विद्यापीठ' संस्थापक सदस्य होण्यासाठी व सदस्यत्वासाठी शुल्क म्हणुन रु. ५,००,०००/- (रु पाच लक्ष मात्र) निधी उपलब्ध करण्यापुर्वी खालिल मुद्यांचे निराकरण राज्य निवडणुक आयोगाकडून प्राप्त करुन घ्यावे व सदर बाब पुन:श्च व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावी :-<br>१. असा निर्णय घेण्याबाबत आयोगाने मा. राज्यपालांची अनुमती घेतली आहे का?<br>२. सुशासन व लोकशाही ही जबाबदारी संबधित निवडणुक आयोगाची आहे. विद्यापीठाची नाही. राज्य निवडणूक आयोगा मार्फत निवडणुका घेण्यासाठी सुधारीत उपाययोजना करणे | |



SKS

| | | |
|---|---|---|
| | विद्यापीठाचे कामकाज नाही.<br>३. रुपये पाच लक्ष एवढा निधी राज्य निवडणुक आयोगाकडे नाही का? विद्यापीठाने एवढा निधी का द्यावा? | |
| **बाब क्र. ८** | **महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक : केंद्रीय -२०१९/प्र.क्र.९/का-१९, तारीख २८/०५/२०१९** for information, ratification and adoption. | |
| **ठराव** | सन २०१८-१९ करिता विशेष केंद्रिय सहाय्य योजनेअंर्तगत " Mumbai School of Economics amd Public Policy Extension of diploma in CFR " या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजुरी देणेबाबतचा शासन निर्णय क्र.केंद्रीय-२०१९/प्र.क्र.९/का-१९ दिनांक २८ मे २०१९ ला स्विकारण्यात आला. | |
| **बाब क्र. ९** | **बांधकाम समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.** | |
| **ठराव** | व्यवस्थापन परिषेदच्या दिनांक २६ एप्रिल २०१९ च्या बैठकीत बाब क्रमांक ९ अन्वये विद्यापीठातील कलिना परिसरातील प्रलंबित प्रोजेक्टस च्या बाबत तपासणी करण्याकरिता गठीत झालेल्या निल हेळेकर समितीचा अहवाल एका वसतीगृहाऐवजी कलिना परिसरातील सर्व वसतीगृहे, परीक्षा भवन व विद्यापीठ ग्रंथालया संदर्भातील कामे तातडीने करावीत या सुधारणेसह स्विकारण्यात आला. किमतीबाबत संबधीत वास्तुविशारद शुल्क (Fees) व कंत्राटदाराची प्रलंबित देयके याबाबत त्यांच्याशी वाटाघाटी करण्यात याव्यात. अहवालातील निर्दिष्ट सर्व संबधित व्यक्तींकडून अहवालातील मुद्यांच्या अनुषंगाने स्पष्टीकरण मागवावे. समितीने या संदर्भातील कार्यवाही तातडीने करावी. | |
| **बाब क्र. १०** | **To regularize the admissions of 36,585 students of first year of all the courses offered at IDOL during the academic year 2018-19 through External Mode.** | **Institute of Distance and Open Learning** |
| **ठराव** | आयडॉलच्या दूरशिक्षण माध्यमातून शैक्षणिक वर्षे २०१८-१९ यावर्षी प्रथम वर्षाच्या विविध अभ्यासक्रमाकरिता ३६,५८५ प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे भविष्यात नुकसान होउ नये म्हणुन त्या विद्यार्थ्यांना | |



5KS

| | | |
|---|---|---|
| | दूरस्थ शिक्षणाएवजी बहिस्थ माध्यमातील विद्यार्थी समजुन (External Mode) समजण्यात यावे व त्यांना बहिस्थ माध्यमातून दिलेली पदवी/पदवीका सर्व शैक्षणिक कारणासाठी तसेच आयडॉल मधून महाविद्यालयाच्या प्रवेशासाठी व महाविद्यालयाकडुन आयडॉलमध्ये प्रवेशाकरिता ग्राह्य धरण्यात येईल. | |
| बाब क्र. ११ | **परिक्षा विभागातील उत्तरपत्रिका खरेदीच्या चौकशीबाबत श्री. दिपककुमार मुकादम, व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत.** | परीक्षा विभाग व आस्थापना विभाग १/३ |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या चर्चेच्या अनुषंगाने मुद्दा क्रमांक ६ च्या अन्वये परीक्षा विभागातील उत्तरपत्रिका खरेदिच्या चौकशीबाबत श्री. दिपककुमार मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या उच्चस्तरीय समितीचा अहवाल स्विकारण्यात आला व त्यानुसार कार्यवाही आणि कारवाई तातडीने करण्यात यावी, असे ठरले. | |
| बाब क्र. १२ | **Mumbai-Ahmedabad High Speed Rail Project – Requirement for Temporary Land for underground Station at BKC.** | **CDU** |
| ठराव | नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे, मुंबई उपनगर, ठाणे व पालघर जिल्ह्यातून जात असल्याने मुंबई उपनगरातील अंडरग्राउंड स्टेशन बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये होणार असल्याने ठेकेदार यांची सोय व इतर पायाभुत सुविधा उभारण्याकरिता विद्यापीठाची १० हेक्टर जागा तात्पुरत्या स्वरुपात शुल्क आकारुन देण्याची विनंती **अमान्य** करण्यात आली व त्यानुसार नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीला कळविण्यात यावे असे निर्देश परिषदेने दिले. | |
| बाब क्र. १३ | **Providing and installation of institutional, Educational furniture of reputed brands to New Exam House Building, Vidyanagari Campus, University of Mumbai, Mumbai – 98.** | **CDU** |
| ठराव | सदर बाब विषयसुचीवरुन मागे घेण्यात आली. | |



5K5

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. १४ | मा. कुलगुरु व प्र-कुलगुरु यांच्या करिता नविन वाहन खरेदी करण्याबाबत. | सामन्य प्रशासन विभाग |
| ठराव | मा. कुलगुरु व प्र-कुलगुरु यांच्या करिता (Innova crystal ZX model) हे नविन वाहन खरेदी करण्यास शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ दिनांक १७ एप्रिल, २०१५ च्या अधिन राहुन (GEM वर नोंदणी करुन) मान्यता देण्यात आली. नविन वाहनासाठी होणारा खर्च विद्यापीठ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सन २०१९-२० मधील '५ इतर खर्च वाहनांची खरेदी' या अर्थशिर्षातून करण्यात यावा. तद्वतच, यापुढे विषय परिषदेसक्षम सादर करताना संबधित अर्थशिर्षातील तरतुदींचे विवरण सोबत सादर करावे असे निर्देश परिषदेने दिले. | |
| बाब क्र. १५ | डॉ. मॅथ्यु चेरीयन यांच्या सेवानिवृत्त प्रकरणाबाबत सहसंचालक कार्यालय विषय सादर करण्याबाबत. | शिक्षक नियुक्ती मान्यता विभाग (म.शि.) |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ इतिवृत्त चर्चा क्रमांक ८ च्या अन्वये डॉ. मॅथ्यु चेरीयन यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणाबाबत ॲड. निल हेळेकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचा अहवाल स्विकारण्यात आला व त्या अनुषंगाने सहसंचालक कार्यालयाकडे डॉ. मॅथ्यु यांचे सेवानिवृत्तीचे वेतन देण्यासाठी पत्र पाठविण्यात यावे. श्रीमती कांती जेजुरीकर, माजी अध्यक्ष, महिला विकास कक्ष यांना अहवालामधील मुद्यांच्या अनुषंगाच्या कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी, असे ठरले. | |
| बाब क्र. १६ | **Permission**<br>**1) To accept Online Attestation Fees of Rs.1000/- from students applying from India.**<br>**2) To accept Online Attestation Fees of $ 100 from students applying from abroad.**<br>**3) To invite E-tender for Online Attestation System.** | **Department of Students Devlopment** |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २६/४/२०१९ मध्ये बाब क्रमांक १४ अन्वये गठित झालेल्या समितीच्या अहवालावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर भारतातील विद्यार्थ्यांकडून रु.५०० व भारताबाहेरील | |



575

| | | |
|---|---|---|
| | विद्यार्थ्यांकडून $ १०० एवढे ऑनलाईन ॲटेस्टेशन शुल्क स्विकारण्यास मान्यता देण्यात आली तसेच ऑनलाईन ॲटेस्टेशन सिस्टम करीता ई-निविदा मागविण्यात याव्या, असे ठरले. तद्वतच संबधित योजनेचा आढावा नियत कालावधीनंतर घेण्यात यावा. | |
| **बाब क्र. १७** | **अध्यक्ष, रामराव अधिक एज्यूकेशन सोसायटी, डी. वाय. पाटील बिल्डींग, एम.आय.डी.सी. कॉलनीच्या समोर, आदर्श नगर, वरळी, मुंबई यांच्या दिनांक २७ डिसेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन मुंबई विद्यापीठ संलग्नित डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर यांचे समायोजन डॉ. डी. वाय. पाटील डीम युनिव्हर्सिटी, नेरुळ, नवी मुंबई मध्ये करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबतचा प्रस्ताव.** | **संलग्नता/ मान्यता विभाग** |
| **ठराव** | शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन मुंबई विद्यापीठ संलग्नित डॉ. डी. वाय पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, डी. वाय. पाटील नॉलेज सिटी, चारोली (बीके), व्हाया लोहगाव, पुणे - ४१० १०५ यांचे समायोजन डॉ. डी. वाय. पाटील डीम्ड युनिव्हर्सिटी, नेरुळ, नवी मुंबई मध्ये करण्यासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यास मान्यता देण्यात आली.<br>परिषदेचे मा. सदस्य श्री. दिपककुमार मुकादम यांनी याबाबत महाविद्यालयाने त्यांच्याकडे प्रलंबित रक्कम नेमकी कोणत्या वर्षापासुन भरण्यात आल्याचा तपशीलाबाबत ते आश्वस्त न झाल्याने सदर ठरावाबाबत आक्षेप नोंदविला. | |
| **बाब क्र. १८** | **विद्यापीठ अधिकारी मंडळावरील निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील/महाविद्यालयातील सेवकांना मानधन मंजूर करण्याबाबत.** | **निवडणूक विभाग** |
| **ठराव** | विद्यापीठ प्राधिकरणे निवडणुकांसाठी नियुक्त केलेल्या विद्यापीठातील सेवकांना मानधन मंजुर करावयाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढिल बैठकीत शासन निर्णयासह एकूण किती रक्कम होते त्याचा कर्मचारी/अधिकारीनिहाय सुधारीत रक्कमेच्या तपशीलासह सादर करण्यात यावी, असे ठरले. | |
| **बाब क्र. १९** | **Name suggestions for Section 8 company for Incubation Center In order of preference** | **Innovation, Incubation & Linkages** |



SKS

| | | |
|---|---|---|
| ठराव | सेक्शन ८, इंडियन कंपनीज ॲक्ट, २०१३ अंर्तगत नव्याने स्थापन होणा-या इनक्युबेशन सेंटरला "Mumbai University Incubation Center Designed for Entrepreneurship and Startups (MU-IDEAS) नावास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. २० | **Nomination of Directors for Section 8 company as suggested by Honorable Vice Chancellor, with respective stake holdings (for enabling decision making)** | **Innovation, Incubation & Linkages** |
| ठराव | सेक्शन ८ इंडियन कंपनीज ॲक्ट अंर्तगत स्थापन झालेल्या इनक्युबेशन सेंटर च्या संचालक मंडळास मान्यता देण्यात आली.<br>1. Director : Innovation, Incubation and Linkages (Ex-Offocio)<br>2. Pro Vice Chancellor (Ex-Offocio)<br>3. Finance and Accounts Officer (Ex-Offocio)<br>To be added later<br>4. High ranking official from corporate Banking Sector<br>5. Industry experts<br>6. 2 First generation successful entrepreneurs<br>7. CEO of the Incubation Center<br>} To be nominated by Vice- Chancellor | |
| बाब क्र. २१ | **विविध शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांसकडून प्राप्त झालेल्या विविध शैक्षणिक कार्यक्रमाकरिता प्राप्त झालेल्या सामंजस्य कराराचा मसुदाबाबतचा प्रस्ताव (1. Tribal Research and Training Institute & MSEPP 2. Academy for Administrative Careers (AAC) & Tribal Research and Training Institute)** | **विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग** |
| ठराव | **1. Tribal Research and Training Institute & MSEPP**<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स आणि पब्लिक पॉलिसी (स्वयत्त) **MSE-PP** व ट्रायबल रिसर्च आणि ट्रेनिंग इंन्स्टिटयुट **(TRTI)** यांच्यामध्ये आदिवासींच्या उपजिविकेच्या विकासासाठी सामंजस्य कराराच्या मसुद्यातील मुद्या क्रमांक ९ व १५ मध्ये खालिल सुधारणेसह मान्यता देण्यात आली. तसेच खालिल मुद्दा क्रमांक ९ मधील व्यवस्थापन परिषदेचा नामनिर्देशित सदस्य | |



SKS [signature]

म्हणुन नामनिर्देशन होण्याबाबत डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी त्यांची अनुकुलता दर्शविली.

**9) Coordination And Periodic Monitoring**

A Standing Collaborative Committee (SCC) has been constituted with members from the said School and the said Institute as under to ensure implementation of this MoU.SCC will be chaired by Pro-VC or his nominee.

| Mumbai School of Economics and Public Policy Mumbai University | The Tribal Research and Training Instutute, Pune |
|---|---|
| Pro-VC (Chairman) | Nominee of the Commissioner, Tribal Research and Training institute, Pune |
| Director, Mumbai School of Economics and Public Policy | Shri ………………. |
| Professor Neeraj Hatekar | Shri ………………. |
| A member of Management Council of The University of Mumbai, Nomonated by the Vice-Chanceler | Shri ………………. |

SCC will review the progress of the work periodically, at least twice a year.

**12) 0 LIABILITY CLAUSE be replaced by**

**"No LIABILITY CLAUSE"**

**15) Settlement of Disputes**

If any dispute arised between the two parties to this MOU regarding implementation of the terms of the MOU or any other matter incidental to or connected with the subject matter of the MOU, such dispute shall be resolved as far as possible



SKS

amicably by the sole Arbitrator mutually agreed by both the parties. The place of the Arbitration shall be Mumbai.

**18) The MOU shall be made in triplicate**

**2. Academy for Administrative Careers (AAC) & Tribal Research and Training Institute**

मुंबई विद्यापीठाचे ॲकेडमी फॉर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह करिअर्स व ट्रायबल रिसर्च व ट्रेनिंग इंन्स्टिटयुट, पुणे, महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये अनुसुचित जमाती/प्र–वर्गातील विद्यार्थ्यांना यु.पी.एस.सी/एम.पी.एस.सी व इतर स्पर्धा परिक्षेच्यासाठी तयार करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्याकरीता सामंजस्य कराराच्या मसुद्यासह खालिल सुधारणेसह मान्यता देण्यात आली :-

**मुद्दा क्रमांक १० Settlement of Disputes**

If any dispute arised between the two parties to this MOU regarding implementation of the terms of the MOU or any other matter incidental to or connected with the subject matter of the Mou, such dispute shall be resolved as far as possible amicably by the sole Arbitrator mutually agreed both the parties. The place of the Arbitration shall be Mumbai.

यापुढील सर्व सामंजस्य करार नवोपक्रम, नवसंशोधन व उपमंडळापुढे सामंजस्य समितीच्या अभिप्रायासह व विधी सल्ल्यासह सादर करुन नंतरच व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावी. जुने सामंजस्य कराराबाबत जसे की, गरवारे, अल्केश दिनेश मोदी यांच्या स्वायत संस्थांच्या गर्व्हनींग बॉडीमध्ये ठेवून MOU करण्यात आले आहेत. सदर सामंजस्य करार सामंजस्य कराराच्या समितीच्या बैठकीत ठेवण्यात यावे. समितीच्या सुचनांच्या अनुपालनानंतर नवोपक्रम, नवसंशोधन व उपमंडळापुढे ठेऊन नंतर व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावे, असे ठरले.



SKS

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. २२ | **विविध शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांसकडून प्राप्त झालेल्या विविध शैक्षणिक कार्यक्रमाकरिता प्राप्त झालेल्या सामंजस्य कराराचा मसुदाबाबतचा प्रस्ताव (MSEPP & Jan Kalyan Samiti Nagpur)** | विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठ, स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स व पब्लिक पॉलिसी (स्वायत्त) व जन कल्याण समिती नागपूर यांच्यामधील विदर्भातील जलसंसाधनाच्या विकासाबाबत करण्यात आलेल्या सामंजस्य कराराच्या मसुद्यास खालिल सुधारणेसह मान्यता देण्यात आली.<br>१) मुद्दा क्रमांक १० 'आरबीटेशन कलम' काढुन टाकण्यात यावा.<br>२) मुद्दा क्रमांक १५ The MOU shall be made in triplicate.<br>तसेच विदर्भ सिंचन विकास महामंडळ (VIDC) कडून 'लेटर ऑफ इन्टेन्ट' घेण्यात यावे. | |
| बाब क्र. २३ | **विश्वविद्यालय अनुदान आयोग कायदा १९५६ कलम १२ (बी) अंतर्गत ज्या महाविद्यालयांना बी. व्होक. व एम. व्होक. अभ्यासक्रमांना मान्यता मिळालेली आहे अशा महाविद्यालयांचे प्रस्ताव वरील ठरावाअंतर्गत बदल करुन शासनास सादर करण्याची परवानगी देण्याबाबत.** | संलग्नता/ मान्यता विभाग |
| ठराव | विश्वविद्यालय अनुदान आयोग कायदा १९५६ कलम १२ (बी) अंतर्गत खालिल महाविद्यालयांना बी. व्होक. व एम. व्होक. अभ्यासक्रमांना मान्यता मिळालेली आहे. | |

| Sr No. | Name of College | Courses | UGC approval Letter |
|---|---|---|---|
| 1 | Rayat Shikshan Sanstha's Karmaveer Baurao patil college, Vashi, Navi Mumbai – 400 703 | B. Voc. (Food Technology) - with intake of 50 students | UGC F No.4-115/2018 (NSQF) dated 1st August, 2018 |
| 2 | People's Education Society's Siddharth College of Commerce & Economics, Fort, Mumbai – 400 001 | 1) B. Voc (Retail Management) – with intake of 50<br>2) B. Voc (Banking & Financial Service) With intake of 50 | UGC F No 5-1/2018 (NSQF) dated 16th August, 2018 |
| 3 | Vidya Prasarak Mandal's K.G. Joshi College of Arts & N. G. Bedekar College of Commerce | 1) B. Voc (sales & Marketing Management) – With intake of 50<br>2) Certificate course in Disaster | UGC No 5-1/2018 (NSQF) dated 6th August, 2018 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Management with intake of 50 | |
| 4 | Ruia Collee, Matunga, Mumbai – 400 019 | M. Voc (Pharma Analytical Sciences) – with intake of 50 | UGC letter D.O.No.3-19/2015 (KAUSHAL) dated 14th August, 2015 |
| 5 | H.R. College of Commerce & Economics | 1) B. Voc (Finance & Taxation) 2) B. Voc (Media and Mass Communication | UGC F No 5-1/2018 (NSQF) dated 6th August, 2018 |
| 6 | Kelkar Education Trust's Vinayak Ganesh Vaze College of Arts, Commerce & Science | B. Voc (Tourism & Hospitality) | UGC letter F No 5- 1/2018 (NSQF) dated 6th August, 2018 |

या महाविद्यालयांचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावेत. अशी दुरुस्ती व्यवस्थापन परिषद दिनांक ७ डिसेंबर २०१८ रोजी बाब क्रमांक २० अन्वये पारित झालेल्या ठरावामध्ये अधिकचा परिच्छेद करुन करण्यात यावी.

तसेच सदर महाविद्यालयांना सलग्नता शुल्क देय असल्यास त्या भरण्यासंदर्भात सुचित करण्यात यावे.

**चर्चेच्या अनुषंगाने खालिलप्रमाणे ठराव पारित झाले.**

१) श्रीमती भावना वैद्य यांच्या प्रकरणात व्यवस्थापन परिषदेत दिनांक २ जानेवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत चर्चेच्या अनुषंगाने मुद्या क्रमांक ८ अन्वये मा. कुलगुरु आणि ॲड. निल हेळेकर यांच्या द्विस्तरीय समितीचा अहवाल ॲड. निल हेळेकर यांनी विषद केला व सदर अहवाल स्विकारण्यात आला. त्यानुसार श्रीमती भावना वैद्य यांना विद्यापीठाने रद्द केलेली मान्यता पुन:श्च प्रदान करण्यात यावी. त्या अनुषंगाने

शिक्षक नियुक्ती मान्यता विभाग (म.शि.)

| | | |
|---|---|---|
| | याबाबत विभागीय सहसंचालकांना त्यांचे निवृत्ती वेतन अदा करण्यासंदर्भात तातडीने कळविण्यात यावे व सदर बाब संबंधित महाविद्यालयाच्या प्रशासनास देखील कळवावी. | |
| | २) सर्व महाविद्यालयांच्या प्रलंबित संलग्नता शुल्काबाबत कुलसचिव, वित्त व लेखा अधिकारी, उपकुलसचिव, संलग्नता विभाग यांनी किमान आठवड्यातून एकदा एकत्रित बैठक घेऊन याबाबत उच्च स्तारीय समितीच्या सहकार्याने आढावा घ्यावा. सर्व महाविद्यलयांबाबत टॅब्युलर फॉरमॅटमध्ये महाविद्यालयाचे नाव, एकूण रक्कम, महाविद्यालयाने अदा केलेली एकूण रक्कम, प्रलंबित येणे बाकी याची तपशीलवार माहिती तातडीने तयार करण्यात यावी. | सलग्नता विभाग |
| | ३) डॉ. रश्मी ओझा यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या नावात बदल/पत्यात बदल व स्थालांतर करण्यासाठीच्या मार्गदशक तत्वे बनविण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ११ जानेवारी २०१८ च्या बैठकीत बाब क्रमांक ६ अन्वये समिती गठीत झाली असुन नावात बदल, महाविद्यालयाचे स्थालांतर व महाविद्यालय बंद करणे (Closure) हे दोन वेगवेगळे विषय आहेत. त्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २६ एप्रिल, २०१९ च्या बैठकीत बाब क्रमांक ११ अन्वये ठेवण्यात आलेल्या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतचा व महाविद्यालयाच्या स्थलांतरण करण्याबाबत समितीचा अहवाल | सलग्नता विभाग |



SKS

| | | |
|---|---|---|
| | दुरुस्तीसह मान्य करण्यात आला. सदर अहवालानुसार संबधित विभागाने तातडीने पुढील कार्यवाही करावी असे निर्देश परिषेदने दिले. | |

कुलसचिवांनी उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

SKSawant

सहायक कुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

इतिवृत्त मंजूर

कुलगुरू